# ओम हॉस्पीटलतर्फे महिलांचा गौरव






कल्याण (आशिनी चौबल):- डोंबिवलीमध्ये ओम हॉस्पीटलतर्फे इंटरनॅशनल वुमन्स डे साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम 'महिलांचा सन्मान व सत्कार' या विषयावर होता.

या कार्यक्रमात डोंबिवलीतील सर्व जीपी डॉक्टर्स उपस्थित होत्या. या कार्यक्रमामध्ये सर्व डॉक्टर्स महिलांनी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये डॉक्टरांनी सोलो, सालसा, बॉलीवूड सारख्या सुपरहिट गाण्यांवर नृत्य केले आणि जुन्या गायकांची आठवण करुन देणारे गाणेही गायले. यामध्ये फॅशन शोचेही आयोजन करण्यात आले होते.

त्यानंतर येथे उपस्थित सर्व महिलांचा सन्मान पुरस्कार व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाचा आनंद सर्व महिलांनी घेतला. तसेच हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. वंदना धाकटोडे १२ वर्षापासून करतात. डोंबिवली पूर्वेत ओम हॉस्पीटल आणि डोंबिवली पश्चिमेत साई श्रद्धा हॉस्पीटलमध्ये डॉ. वंदना या सर्जन आहेत.

हा कार्यक्रम सर्व डॉक्टरांनी आपला वेळ काढून केला होता. मॅडम नेहमी सांगतात की तुम्ही दुसऱ्यांना समजून घ्या, त्यांची हेल्प करा असे डॉ. वंदना मॅडम यांनी उपस्थित पाहूण्यांचा सांगितले. या कार्यक्रमामध्ये जे नृत्य सादर केले त्या नृत्याचे व फॅशन शोचे आयोजन व कोरोग्राफर किरण दाभोळे आणि असिस्टंट अजय जडेजा यांनी केले. तसेच या कार्यक्रमामध्ये वंदना मॅडमचे एम्प्लॉय, भारती मुळे, पुनम आंबरे, शालन कांबळे, जॉली नायर आणि कविता सुर्वे उपस्थित होते. तसेच डोंबिवलीतील सर्व डॉक्टर आणि प्रमुख पाहूणे उपस्थित होते.

## त्साहात साजरा



## मैत्री ग्रुप फॉर लेडीजतर्फे महिलांना गौरव पुरस्कार




आपले मनातील विचार व भावना व्यक्त केल्या.

महिला रोजच्या जीवनात काहीतरी नवीन शिकत